समुद्री उत्पाद निर्यात विकास प्राधिकरण
(वाणिज्य एवं उद्योग मंत्रालय, भारत सरकार)
एम पी ई डी ए भवन, पनंपिल्ली एवन्यू
डाक पेटी सं. 4272, कोच्ची-682036, भारत
The Marine Products Export Development Authority
(Ministry of Commerce & Industry, Govt. of India)
MPEDA House, Panampilly Avenue
P.B. No. 4272, Kochi-682 036, India
फोन Phone : 2311979, 2311901, 2311854, 2311803, 2313415, 2314468, 2315065
फैक्स Fax : 91-484-2313361
E-mail : ho@mpeda.gov.in
Website : www.mpeda.com

मसुदा प्रसिद्धी वृत्त

# 2020-21 मध्ये भारताची 11,49,341 MT सीफूड निर्यात

- कोव्हिड, मंदावलेले मार्केट व लॉजिस्टीकल अडचणींमुळे 10.88% घट, परंतु शेवटच्या तिमाहीमध्ये सुधारणा: एमपीईडीए अध्यक्ष

- एक्वाकल्चर क्षेत्राचे उत्तम प्रदर्शन; माशांच्या निर्यातीमध्ये तिलापिया आणि शोभेच्या माशांचे प्रमाण वाढले

**कोची, 2 जून:** भारताच्या नव्याने उभारी घेणा-या सीफूड क्षेत्रावर कोव्हिड महामारी आणि मंदावलेल्या विदेशी मार्केटची छाया पडलेली दिसली व आर्थिक वर्ष 2020- 21 मध्ये देशाने रू. 43,717.26 कोटी (US$ 5.96 अब्ज) रकमेच्या 11,49,341 MT समुद्री उत्पादनांची निर्यात केली व आधीच्या वर्षाच्या तुलनेत हे प्रमाण 10.88 टक्के इतके कमी होते.

अमेरिका, चीन आणि युरोपियन युनियन (ईयु) हे आयात करण्यात अग्रगण्य होते तर फ्रोजन कोळंबी ही सर्वाधिक निर्यात होणारा घटक ठरला व त्यानंतर फ्रोजन मासे दुस-या क्रमांकावर होते.

2019-20 मध्ये भारताने 12,89,651 MT समुद्री फूडची निर्यात केली होती व त्याचे मूल्य रू. 46,662.85 कोटी (US$ 6.68 अब्ज) होते व 2020- 21 मध्ये रुपयाच्या स्वरूपात 6.31 टक्के घट झाली आणि डॉलरच्या स्वरूपात 10.81 टक्के घट झाली.

“वर्षाच्या पहिल्या सहामाहीत सीफूड निर्यातीवर महामारीचा प्रचंड परिणाम झाला परंतु 2020- 21 च्या शेवटच्या तिमाहीत निर्यातीत चांगली वाढ झाली. तसेच, ह्या आर्थिक वर्षामध्ये एक्वाकल्चर क्षेत्राने चांगले प्रदर्शन केले व डॉलरच्या स्वरूपात निर्यात केलेल्या घटकांमध्ये त्या क्षेत्राचा वाटा 67.99 टक्के होता आणि एकूण वजनात 44.45 टक्के वाटा होता व 2019-20 च्या तुलनेत हे अनुक्रमे 4.41 टक्के आणि 2.48 टक्के जास्त आहे,” असे मरीन प्रॉडक्टस एक्स्पोर्ट डेव्हलपमेंट ऑथोरिटीचे (एमपीईडीए) अध्यक्ष श्री. के. एस. श्रीनिवास ह्यांनी म्हंटले.

फ्रोजन कोळंबीचा वाटा एकूण वजनात 51.36 होता तर एकूण डॉलर उत्पन्नात वाटा 74.31 टक्के होता. अमेरिका सर्वात जास्त आयात करणारा देश ठरला (2,72,041 MT), त्यानंतर चीन (1,01,846 MT), ईयु (70,133 MT), जपान (40,502 MT), दक्षिण पूर्व आशिया (38,389 MT), आणि मध्य पूर्व (29,108 MT) हे देश व प्रदेश होते.

परंतु, कोळंबीच्या निर्यातीमध्ये डॉलरच्या मूल्यासंदर्भात 9.47 टक्के घट झाली आणि एकूण वजनात 9.50 टक्के घट झाली. एकूण कोळंबीची निर्यात 5,90,275 MT होती व तिचे मूल्य 4,426.19 दशलक्ष डॉलर्स

समुद्री उत्पाद निर्यात विकास प्राधिकरण
(वाणिज्य एवं उद्योग मंत्रालय, भारत सरकार)
एम पी ई डी ए भवन, पनंपिल्ली एवन्यू
डाक पेटी सं. 4272, कौच्ची-682036, भारत
The Marine Products Export Development Authority
(Ministry of Commerce & Industry, Govt. of India)
MPEDA House, Panampilly Avenue
P.B. No. 4272, Kochi-682 036, India
फोन Phone : 2311979, 2311901, 2311854, 2311803, 2313415, 2314468, 2315065
फैक्स Fax : 91-484-2313361
E-mail : ho@mpeda.gov.in
Website : www.mpeda.com

होते. वन्नामाई (व्हाईटलेग) कोळंबीची निर्यात 2020-21 मध्ये 5,12,204 मेट्रिक टन वरून 4,92,271 मे.टन पर्यंत घसरली. वन्नामाई (व्हाईटलेग) कोळंबीच्या एकूण डॉलरमधील निर्यात मूल्यामध्ये 56.37 टक्के अमेरिकेला निर्यात केले गेले व त्यानंतर चीन (15.13 टक्के), ईयु (7.83 टक्के), दक्षिण पूर्व आशिया (5.76 टक्के), जपान (4.96 टक्के) आणि मध्य पूर्व (3.59 टक्के) असा क्रम होता.

ब्लॅक टायगर (पिनियस मोनोडॉन) कोळंबीचे मुख्य मार्केट असलेल्या जपानचा वाटा डॉलर मूल्यामध्ये 39.68 टक्के होता व त्यानंतर अमेरिका (26.03 टक्के), दक्षिण पूर्व आशिया (9.32 टक्के), ईयु (8.95 टक्के), मध्य पूर्व (6.04 टक्के) आणि चीन (3.76 टक्के) असा क्रम होता.

डॉलर मूल्यामध्ये 6.75 टक्के व एकूण वजनात 16.37 टक्के वाटा असलेल्या फ्रोजन माशांनी निर्यातीमध्ये दुसरे स्थान कायम राखले, परंतु त्याच्या शिपमेंटमध्ये एकूण वजनात 15.76 टक्के व डॉलर मूल्यात 21.67 टक्के इतकी घसरण झाली.

'इतर पदार्थ' या तिसऱ्या क्रमांकाच्या प्रकारामध्ये मुख्यत: सुरीमी (फिश पेस्ट) आणि सुरीमी एनालॉग (इमिटेशन) उत्पादनांचा समावेश होता व त्यांच्यामध्ये अनुक्रमे एकूण वजनात आणि रुपये मूल्य ह्यांमध्ये 0.12 टक्के आणि 0.26 टक्के इतकी अल्प वाढ दिसून आली, परंतु डॉलरच्या संदर्भात 5.02 टक्के घट झाली.

फ्रोजन स्क्विड आणि फ्रोजन कटलफिश निर्यातींमध्ये एकूण वजनात अनुक्रमे 30.19 टक्के आणि 16.38 टक्के घट झाली. परंतु, सुकी मासळी या प्रकारामध्ये अनुक्रमे एकूण वजनात आणि रूपये मूल्यामध्ये 1.47 टक्के आणि 17 टक्के वाढ झाली.

महामारीच्या काळामध्ये मर्यादित झालेल्या मर्यादित एअर कार्गो कनेक्टिव्हिटीमुळे नकारात्मक परिणाम झालेल्या चिल्ड घटक आणि जीवंत घटकांच्या शिपमेंटस या मध्ये एकूण वजनात अनुक्रमे 16.89 टक्के आणि 39.91 टक्के इतकी घट झाली.

कॅप्चर फिशरीजचे एकूण वजनातील योगदान 56.03 टक्के वरून घटून 53.55 टक्के झाले आणि डॉलर मूल्यामध्ये ते 36.42 टक्के वरून घटून 32.01 टक्के झाले. परंतु तिलापिया आणि शोभेच्या माशांनी एकूण वजनात अनुक्रमे 55.83 टक्के आणि 66.55 टक्के असे चांगले प्रदर्शन केले व डॉलर उत्पन्नामध्ये त्यांचे प्रमाण 38.07 टक्के आणि 14.63 टक्के असे वाढले. ट्युना माश्याचे एकूण वजन 14.63 टक्के वाढले, परंतु डॉलरमधील त्याचे मूल्य 7.39 टक्के घटले. खेकडे आणि स्काम्पी निर्यात ही वजन व मूल्य अशा दोन्हीमध्ये घटली.

अमेरिका 2,91,948 MT इतक्या आयातीसह भारतीय सीफूड आयात करणारा प्रमुख आयातकर्ता राहीला आणि डॉलरमध्ये त्याचा वाटा 41.15 टक्के होता. त्या देशातील निर्यात, रुपयाच्या मूल्यात 0.48 % इतकी

समुद्री उत्पाद निर्यात विकास प्राधिकरण
(वाणिज्य एवं उद्योग मंत्रालय, भारत सरकार)
एम पी ई डी ए भवन, पनंपिल्ली एवन्यू
डाक पेटी सं. 4272, कौच्ची-682036, भारत
The Marine Products Export Development Authority
(Ministry of Commerce & Industry, Govt. of India)
MPEDA House, Panampilly Avenue
P.B. No. 4272, Kochi-682 036, India
फोन Phone : 2311979, 2311901, 2311854, 2311803, 2313415, 2314468, 2315065
फैक्स Fax : 91-484-2313361
E-mail : ho@mpeda.gov.in
Website : www.mpeda.com

वाढली, परंतु अनुक्रमे एकूण वजन आणि डॉलर मूल्यामध्ये 4.34 टक्के आणि 4.35 टक्के इतकी घट झाली. अमेरिकेला निर्यात होणा-या घटकांमध्ये फ्रोजन कोळंबी मुख्य घटक होता तर वजनाच्या संदर्भात वन्नामाई कोळंबीमध्ये 6.75 टक्के इतकी वाढ झाली. परंतु, अमेरिकेची ब्लॅक टायगर कोळंबीची आयात अनुक्रमे एकूण वजन आणि डॉलर संदर्भात 70.96 टक्के आणि 65.24 टक्के इतकी घट झाली.

939.17 दशलक्ष डॉलर्स किंमतीच्या, 2,18,343 MT इतक्या सीफूडच्या आयातीसह, डॉलर मूल्यामध्ये 15.77 टक्के आणि एकूण वजनामध्ये 19 टक्के वाट्यासह चीन हे दुसरे सर्वांत मोठे मार्केट ठरले. परंतु ह्या देशामधील निर्यात अनुक्रमे एकूण वजन व डॉलरच्या संदर्भात 33.73 टक्के आणि 31.68 टक्के इतकी घटली. चीनला झालेल्या निर्यातीमध्ये फ्रोजन कोळंबी हा सर्वांत मोठा घटक होता व एकूण वजनामध्ये त्याचा वाटा 46.64 टक्के होता व डॉलरच्या उत्पन्नात 61.87 टक्के होता.

डॉलर मूल्यामध्ये 13.80 टक्के ह्या वाट्यासह ईयु तिसरा सर्वांत मोठे आयातदार ठरला व फ्रोजन कोळंबी हे तिथे आयात केलेला मुख्य घटक होता. परंतु ईयु देशांमधील फ्रोजन कोळंबीची निर्यात अनुक्रमे एकूण वजन आणि डॉलर मूल्यामध्ये 5.27 टक्के आणि 6.48 टक्के इतकी घटली.

दक्षिण पूर्व आशियातील निर्यातीचा डॉलर मूल्यामधील वाटा 11.17 टक्के होता. परंतु, एकूण वजनामध्ये त्यात 2.56 टक्के तर डॉलर मूल्यामध्ये 5.73 टक्के इतकी घट झाली. पाचवा सर्वांत मोठा आयात करणारा व डॉलरमधील 6.92 टक्के वाटा असलेल्या जपानमधील शिपमेंटसमध्ये एकूण वजनामध्ये 10.52 टक्के इतकी वाढ झाली परंतु डॉलर मूल्यामध्ये 2.42 टक्के घट झाली.

डॉलरच्या मूल्यामध्ये 4.22 टक्के इतका वाटा असलेल सहावा सर्वांत मोठा आयातदार असलेल्या मध्य पूर्वेमधील निर्यातीमध्ये एकूण वजनामध्ये 15.30 टक्के आणि डॉलर मूल्यामध्ये 15.51 टक्के इतकी घट झाली. निर्यातीमधील मुख्य घटक फ्रोजन कोळंबी होता व डॉलरच्या संदर्भात त्याचा वाटा 72.23 टक्के होता.

श्री. श्रीनिवास ह्यांनी म्हंटले की, महामारीच्या परिणामाशिवाय, इतर अनेक घटकांनी 2020-21 मध्ये सीफूड निर्यातीवर नकारात्मक परिणाम केला. उत्पादनाच्या बाजूने, मासेमारीचे दिवस कमी असल्याने बंदरावर मासे उतरण्याचे प्रमाण कमी होते, संथ लॉजिस्टीक हालचाली आणि बाजारामधील अनिश्चितता, मासेमारीमधील व प्रोसेसिंग संकुलातील कामगारांची कमतरता, बंदरांवर कंटेनर्सची कमतरता, वाढीव विमान वाहतुक शुल्क आणि हवाई सेवांची मर्यादित उपलब्धता ह्यामुळे विशेषत: उच्च मूल्याच्या चिल्ड व लाईव्ह घटकांच्या निर्यातीवर परिणाम झाला.

विदेशी बाजारामधील परिस्थितीचाही नकारात्मक परिणाम झाला. चीनमध्ये कंटेनर शॉर्टेज होते, फ्राईट शुल्क वाढले होते व सीफूड कन्साईनमेंटमध्ये कोव्हिड चाचण्यांमुळे बाजारपेठेमध्ये अनिश्चितता पसरली होती. अमेरिकेमध्ये कंटेनर्सच्या कमतरतेमुळे वेळेमध्ये ऑर्डर्स पूर्ण करणे कठीण बनले होते. हॉटेल- रेस्टॉरंट

समुद्री उत्पाद निर्यात विकास प्राधिकरण
(वाणिज्य एवं उद्योग मंत्रालय, भारत सरकार)
एम पी ई डी ए भवन, पनंपिल्ली एवन्यू
डाक पेटी सं. 4272, कौच्ची-682036, भारत
The Marine Products Export Development Authority
(Ministry of Commerce & Industry, Govt. of India)
MPEDA House, Panampilly Avenue
P.B. No. 4272, Kochi-682 036, India
फोन Phone : 2311979, 2311901, 2311854, 2311803, 2313415, 2314468, 2315065
फैक्स Fax : 91-484-2313361
E-mail : ho@mpeda.gov.in
Website : www.mpeda.com

आणि कॅफे (होरेकॅ) घटक बंद असल्यामुळे मागणीवरही परिणाम झाला. जपान आणि ईयुमध्ये कोव्हिडमुळे लावल्या गेलेल्या लॉकडाउनमुळे रिटेल, रेस्टॉरंट, सुपरमार्केट आणि हॉटेलमधील मागणी मंदावली होती.

समाप्त.